# 'महिला नेतृत्व आणि महिलांच्या समस्या'

**स्वाती सदाशिव कुराडे,** एम. फील. (विद्यार्थिनी),टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, **PRN No. : 02216402891**

**Abstract**

नेतृत्व म्हणजे विशिष्ट ध्येय प्राप्त करण्याच्या प्रयत्नांचे संघटन व दिग्दर्शन करण्याच्या हेतुने प्रेरित झालेले वर्तन होय.

हे नेतृत्व, उद्दिष्ट राजकीय असेल तर ते नेतृत्व राजकीय नेतृत्व ठरते. कोणात्याही व्यक्तीला आपल्या इच्छेनुसार राजकीय सत्ता स्थापन करता येत नाही. त्याचप्रमाणे कोणतेही राजकीय पद हे व्यक्तीला त्याच्या जन्मानुसारही प्राप्त होत नसते. राष्ट्रातील लोकांची इच्छा व आकांक्षा पूर्ण करणारे नेतृत्व हे अधिमान्य राजकीय नेतृत्व समजण्यात येते निर्णय घेण्याची क्षमता, निर्णयांची अंमलबजावणी करण्याची सक्ती आणि कृती यावर नेत्याची अधिमान्यता अवलंबून असते.

महिला नेतृत्वाचा विचार करत असताना भारताच्या राजकीय व्यवस्थेत महिलांचे नेतृत्व, राजकीय राजभाग अल्प स्वरुपाचा राहिला आहे. तसा १९७० नंतर महिलांचा राजकीय सहभाग वाढलेला दिसतो. मात्र नेतृत्व हे अल्पच आहे. लोकसभा राज्यसभा, विधानसभा, विधान परिषद, स्थानिक स्वराज्य संस्था, महिला संघटन, महिला बचत गट अशा विविध पातळ्यावर महिलांचे नेतृत्व दिसते. सत्ता, संपत्ती अधिकार, प्रतिष्ठा मिळवण्यासाठी महिला वर्गाचे संघटन केले जात आहे. ७३ व ७४ व्या घटनादुरुस्ती नंतर खऱ्या अर्थाने महिला नेतृत्वास गती प्राप्त झाल्याचे दिसते. भारताला स्वातंत्र्य मिळून सत्तर वर्षे पूर्ण झाली असली तरी लोकशाही राष्ट्र म्हणून महिलांविषयक समस्यांना अजून सामोरे जावे लागत आहे. राजकीय दृष्टिकोनातून विचार केला असता महिलांना उमेदवारी देताना पक्षीय, घराणेशाही, आरक्षण या दृष्टिकोनातूनच विचार होत असताना दिसतो. त्यामुळे मानसशास्त्रीयदृष्ट्या स्त्री राजकारणापासून उदासिन राहते. याप्रमाणेच विविध समस्या पुढीलप्रमाणे.

१) शिक्षणाचा अभाव

२) महिलांचा राजकारणाकडे बघण्याचा नकारात्मक दृष्टिकोन

३) कुटुंबाच्या राजकीय पार्श्वभूमीचा पडणारा प्रभाव

४) महिलांची कुटुंबप्रती असलेली जबाबदारी

५) पुरुषसत्ताक संस्कृती

या व अशा अनेक समस्यांना महिलांना सामोरे जावे लागते. महिलांचे प्रमाण, सहभाग सापेक्षतः वाढला असला तरी महिला नेता म्हणून पुढे येताना दिसत नाहीत. राष्ट्रीय पातळीवरती मोजक्याच महिला नेतृत्व करताना दिसतात. मात्र त्यांचा आदर्श ही इतर महिलांना प्रेरणादायी ठरत आहे. ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीमुळे किमान महिलांचा सहभाग व नेतृत्व करण्याची क्षमता वाढीस लागलेली दिसून येते. ही खूप मोठी सकारात्मक बाब आहे.

## नेतृत्व :

नेतृत्व म्हणजे विशिष्ट ध्येय प्राप्त करण्याच्या प्रयत्नांचे संघटन व दिग्दर्शन करण्याच्या हेतुने प्रेरित झालेले वर्तन होय.

हे वर्तन, उद्दिष्ट राजकीय असेल तर ते नेतृत्व राजकीय नेतृत्व ठरते. हे वर्तन परिस्थितीसापेक्ष असते. नेतृत्वाचे स्वरुप नेता अनुयायी उद्दिष्ट व ते गाठण्याचे मार्ग यावर अवलंबुन असते. नेत्याच्या क्षमतेवर व अधिमान्यतेवर अनुयायी नेतृत्व स्विकारतील की नाही हे अवलंबून असते. नेत्याची अधिमान्यता तो अधिकार पदावर आहे की नाही यावर किंवा यावर किंवा त्याच्या व्यक्तिगत गुणांवर व वैशिष्ट्यांवरदेखील अवलंबून असते. नेत्याची सामाजिक पार्श्वभूमी (त्याचा वर्ग, जात, लिंग, शिक्षण इ) समाजाची राजकी संस्कृती, विशिष्ट कालावधीमध्ये राजकीय परिस्थिती राजकीय व्यवस्थेचा प्रकार आणि राजकीय विकासाची पातळी इत्यादी घटकांमुळे नेतृत्वाचा प्रकार यशापयश व वैशिष्ट्ये ठरतात.

काहीजण नेतृत्वाला एक वलय किंवा किमया समजतात तर काहीजण त्या व्यक्तीला अधिकारामुळे मिळणारे महत्त्व मानतात. नेतृत्व सिद्धांत आणि या विषयावर संशोधन करणाऱ्या राल्फ एम स्टॉग डील यांच्या मते, जगभरात

जितक्या व्यक्तींनी आजपर्यंत आपल्या नेतृत्वाची चमक दाखवली आहे, तितक्या नेतृत्वाच्या व्याख्या असू शकतात. थोडक्यात नेतृत्व म्हणजे ठराविक वेळेत एखादे काम इतरांकडून कौशल्य करुन घेणे. नेत्याकडे अधिकार आणि सत्ता याचे एक अजब मिश्रण असते त्यामुळे लोक प्रभावित होतात आणि त्यांनी दिलेल्या सूचनाचं पालन करतात.

**नेतृत्वाची व्याख्या –**

१) **जॉन मॅक्सवेल –** यांनी आपल्या '21 Irregutable Laws of leadership' मध्ये व्याख्या दिली आहे. 'Leadership is influence – nothing more nothing less' नेतृत्व म्हणजे एक प्रभाव आहे – नाही जास्त, नाही कमी.

२) **पीटर ड्रकर –** यांनी आपल्या 'The leader of the future' मध्ये व्याख्या दिली आहे. 'The only definition of a leader is someone who has followers' एका नेतृत्वाची व्याख्या अशी आहे की ज्याचे कोणी अनुयायी आहेत'.

३) **वॉरेन बोन्निस–** 'Leadership is a function of knowing yourself having a vision that is well & communicated, building trust among colleagues and taking effective action to realize your own leadership potential'.

'नेतृत्व म्हणजे स्वत:ला ओळखण्याचे एक कार्य आहे, एक स्वप्न जे तुम्हांला सत्य करायचे आहे. सहकाऱ्यामध्ये विश्वास निर्माण करणे आणि प्रभावी कार्य करण्यासाठी स्वत:च्या नेतृत्वाची जाणीव होणे.'

नेतृत्व ही संकल्पना जरी आपल्या नित्य परिचयाची असली तरी वास्तवात तिचे विश्लेषण करणे कठीण जाते. नेतृत्वाचे विशेष म्हणजे नेत्याची प्रेरणा, प्रोत्साहन देण्याची क्षमता असणे होय, तसेच सिध्दांतानुसार मानवी कार्यशक्ती ही प्रोत्साहन, प्रेरणेवरच कार्यरत असते.

समाजाचे नेतृत्व करणे हे नेत्यांचे आणि नेत्यांकडून मार्गदर्शनाची अपेक्षा करणे हे अनुयायांचे कार्य आहे. प्रभाव पाडणारी व्यक्ती म्हणजेच नेता किंवा पुढारी होय आणि प्रभावित झालेले लोक म्हणजेच अनुयायी होत. परिस्थितीनुसार नेता व अनुयायी यांच्या बदल होत असतो. पारंपारिक नेतृत्व प्रामुख्याने जात वर्ग किंवा विशिष्ट समूह यांच्या सदस्यत्वामुळे निर्माण झाले होते. परंतु आधुनिक काळात लोकशाही आणि जनतेचे सार्वभौमत्व या संकल्पनेचा स्वीकार आणि प्रसाद झाला आणि त्या विचारसरणीतून नेतृत्व उदयास आलेले दिसते.

लोकशाही राजकीय व्यवस्थेत निवडणुकांना फार महत्व असते. निवडणुकांमुळे राजकीय नेतृत्वांमध्ये बदल होत असताना दिसतो. त्यामुळे कधी कधी तळाशी असलेले नेतृत्व शिखरांपर्यंत पोहचते तर कधी शिक्षरावर असणारे नेतृत्व भूईसपाट होते.

कोणत्याही व्यक्तीला आपल्या इच्छेनुसार राजकीय सत्ता स्थापन करता येत नाही. त्याचप्रमाणे कोणतेही राजकीय पद हे व्यक्तीला त्याच्या जन्मानुसार ही प्राप्त होत नसते. राष्ट्रातील लोकांची इच्छा व आकांक्षा पूर्ण करणारे नेतृत्व हे अधिमान्य राजकीय नेतृत्व समजण्यात येते. निवडणुका व नेमणुका या आधारावरील राजकीय नेतृत्व अधिमान्य नेतृत्व असते. त्यालाच लोकांचा पुढारी आणि राष्ट्रीय नेता असे मानण्यात येत. निर्णय घेण्याची क्षमता, निर्णयाची अंमलबजावणी करण्याची शक्ती आणि कृती यावर नेत्याची अधिमान्यता अवलंबून असते.

नेतृत्व ही समूहाचे उद्दिष्ट प्राप्त करण्याकरिता अनुयायी म्हणविल्या जाणाऱ्या लोकांना एकात्मेने वागण्यास उत्तेजन देणारी एक वागण्याची पध्दती आहे. नेतृत्वावर व्यक्तीचे गुणदोश, तिचे स्थान व त्यानुरुप घेतलेली भूमिका यांचा परिणाम होत असला तरी ते सामान्यत: परिस्थितीनिर्मिती असते. नेतृत्वाच्या परंपरागत विचारात शूरत्व किंवा मर्दुमकी हे व यासारखे सार्वत्रिक गुणविशेष महत्त्वाचे ठरतात, पण नेतृत्वाचा विचार करताना परिस्थितीचाही विचार महत्त्वाचा असतो. सुप्त कृतक तसेच वास्तविक अशा नेतृत्वातील तंत्र व भूमिका यांतील भेद, नेतृत्वाची प्रक्षेपित प्रतिमा व अनुयायांचे स्वभाव आणि प्रतिसाद यांचाही अभ्यास आवश्यक ठरतो.

समान हितसंबंध किंवा ध्येय असणाऱ्या समूहाचे व व्यक्तीचे परस्परसंबंध नेतृत्वाद्वारे दिग्दर्शित होतात, असे काही लोक मानतात. नेतृत्वाच्या समाजशास्त्रीय व्याख्येतून सामान्यत: आनुवंशिक हक्क, रुढी व साहित्य कलादी क्षेत्रांतील यश यांच्या आधारे अग्रेसर स्थान मिळविणाऱ्या लोकांना वगळण्यात येते. मॅकिआव्हेली, कार्लाल यांसारख्या विद्वानांनी एकोणिसाव्या शतकात लिहिलेल्या नेतृत्वावरील प्रबंधात नेतृत्वाच्या कल्पित क्षमतेवर व गुणविशेषांवर भर दिलेला आढळतो. पारंपरिक दृष्टिकोनाचा प्रभाव सैनिकी क्षेत्रात अजूनही टिकून असल्याचे दिसते. तथापित आधुनिक

मानसशास्त्रीय व समाजशास्त्रीय अभ्यासात नेतृत्वातील व्यक्तींच्या परिस्थितीच्या परस्परसंबंधावर भर देण्यात येतो. नेतृत्वाच्या अभ्यासात चार गोष्टींचा विचार सामन्यपणे करण्यात येतो : (१) नेता त्याची योग्यता, व्यक्तिमत्त्व व अधिकार, (२) अनुयायी त्यांची योग्यता व अधिकार, (३) परिस्थिती जिच्या संदर्भात नेता व अनुयायीसंबंधी निर्माण होतात आणि (४) गटाचे उद्दिष्ट किंवा कार्य सामूहिक उद्दिष्ट व सामूहिक जीवनाच्या दृष्टीने नेतृत्वाची भूमिका महत्त्वाची आहे. समूहात एकजूट राखणे, तो सुस्थिर ठेवणे, समूहाच्या प्रयोजनास पोषक अशी कार्यविभागणी करणे, सर्व व्यक्तींमध्ये सुसंवाद साधरणे व सर्वांचे समाधान करणे यांची जबाबदारी नेतृत्वावर असते. समूहावर बिकट प्रसंग आला असता त्यातून निभावून जाण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना आखणे, व्यक्तींना मार्गदर्शन करणे, त्यांच्या षक्ती कार्यान्वित करणे, व्यक्तींच्या आकांक्षांचा समूहाच्या मूलभूत प्रयोजनांशी मेळ घालून समूहाच्या रचनाबंधामध्ये समयोजनात्मक परिवर्तन घडवू आणण्यास हातभार लावणे इत्यांदीसाठीही नेतृत्वाची आवश्यकता असते. हीच गोश्ट व्यापक समाजानाही लागू आहे. रुढी व परंपरा यामुळे काही समाजाची रचना सुबध्द व सुस्थिर असते. अशा समाजांमध्ये व्यवसाय, धार्मिक श्रध्दा व समजुती तसेच आचार, नैतिक मूल्ये, भाषा इ. बाबतीत पोटसमाजद (सब–सोसायटीज) असतात. त्यांचे संबंध सलोख्याचे, परस्परांनी हितकारक व एकंदर समाजाच्या एकात्मतेस पोषक राहतील, हे पाहण्याचे कार्य समाजात मान्यता पावलेला वर्ग किंवा त्या वर्गाचे प्रतिनिधी करीत असतात. ज्या वेळी पुर्वापार रचना असमाधानकारक ठरु पाहते, त्या वेळी तर लोकांच्या अभिवृत्तीत व वर्तनात बदलत्या परिस्थितीस अनुरुप असे परिवर्तन घडवून समाज अभंग राखण्यासाठी नेतृत्वाची आवश्यकता असते.

## महिला नेतृत्त्वाच्या विकासातील अडचणी :

महिला आणि पुरुष नेतृत्वामध्ये काही फरक आहे का, असा प्रश्न उपस्थित झाला तर निश्चितपणे यात फरक पडतो, असे उत्तर कोणीही देईल; परंतु पॉवेल या मानसशास्त्रज्ञाने १९९० मध्ये संशोधन करून पुरुष किंवा महिला नेतृत्वामध्ये फार मोठा फरक नसल्याचे दाखवून दिले आहे. अगदी किरकोळ बाबतीत हा पडत असल्याचे त्याचे म्हणणे आहे. पॉवेलने यासाठी १५० नेत्यांचा अभ्यास केला आहे. हा अभ्यास करीत असताना त्याने कामाला किंवा जबाबदारीला प्राधान्य देण्याऐवजी माणसाला प्राधान्य देण्याची मानसिकता तसेच एकाधिकारशाहीविरुद्ध लोकशाही निर्णयपद्धती या निकषांचा आधार घेतला आहे.

या अभ्यासात त्याला असे आढळून आले की, स्त्री नेता कधीही व्यक्तिचा विचार करून लोकशाही पद्धतीने निर्णय घेतात आणि पुरुषांमध्ये अशाप्रकारे निर्णय घेण्याची मानसिकता कमी असते. लोकही स्त्री नेत्यपेक्षा पुरुष नेत्यालाच अधिक मोठ्या प्रमाणात मान्यता देत असल्याचे त्याला संशोधनात आढळून आले आहे. पुरुष असो वा महिला, दोघांचीही कार्यक्षमता सारखीच असली तरी लोक स्त्रीपेक्षा पुरुषालाच वरचा क्रम देतात. छुरुषापेक्षा स्त्रीला कमी लेखण्याची पुरुष नोकरशहांची मानसिकता असल्याचेही आढळून आली आहे. स्त्रीकडे पाहण्याचा पारंपरिक दृष्टिकोन हे त्याचे प्रमुख कारण आहे.

## जागतिक स्तरावरील महिला नेतृत्व :

जागतिक स्तरावरील महिला नेतृत्वाचा विचार करता असे निदर्शनास येते की बहुतेक देशांमध्ये निर्णय निर्धारण प्रक्रियेत महिलांचे प्रमाण कमीच आहे. औद्योगिक क्रांतीने महिलांना त्यांचे घर, शेत या मर्यादिबाहेर आणले असले तरी स्त्रियांचे शोषण मात्र या प्रत्यके क्षेत्रात सुरूच होते. शहरे उद्योगांची केंद्रे बनत असताना या क्षेत्रात स्त्रिया मोठ्या प्रमाणावर काम करू लागल्या. एका खोलीत दाटीवाटीने सोळा–सोळा तास या स्त्रियांना काम करावे लागे. कमी कौशल्याचे, कंटाळवाणे आणि कमी मोबदल्याचे काम स्त्रियांच्या वाट्याला येई. यातूनच या शोषणाविरुद्ध लढण्याचा आत्मविश्वास स्त्रियांमध्ये निर्माण झाला आणि १८२० च्या सुमारास इंग्लंड, अमेरिकेतील वस्तोद्योगात काम करणाऱ्या स्त्रिया उत्स्फूर्तपणे संपावर गेल्या. दहा तासांचा कामाचा दिवस असावा, अशी मागणी मान्य करून घेण्यास या स्त्रियांना १८४८ पर्यंत वाट पहावी लागली.

अमेरिकेत १८८० च्या सुमारास 'अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर' ही कामगार संघटना कार्यरत होती. मात्र यात एकही महिला सदस्य नव्हती. कारण संघटनेचे दरवाजे महिलांसाठी बंद होते. या वेळी स्त्री कामगारांनी 'द वूमन्स ट्रेड युनियन लीग' ची स्थापना केली. आठ तासांचा कामाचा दिवस, मुलांसाठी शाळा व शोषण बंद करावे या संघटनेच्या प्रमुख मागण्या होत्या. विसाव्या शतकाच्या प्रारंभी या स्त्रियांनी अनेक ठिकाणी आंदोलने केली. स्त्रियांच्या प्रजननावरच्या

नियंत्रणाचा हक्क त्यांनी या सर्वसाधारणवर्गीय लढ्याशी जोडून घेतला. ही मागणी करण्याचे धैर्य आणि दूरदृष्टी इतर कोणत्याही संघटनेकडे नव्हती.

त्यानंतरच्या काळात न्यूयॉर्क आणि लॉरेन्समध्ये झालेले संप स्त्रियांच्या चळवळीचे संप म्हणून ओळखले जातात. २०–२५ हजाराच्या संख्येने वेगवेगळ्या भाषा बोलणाऱ्या, भिन्न राष्ट्रीयत्वाच्या स्त्रिया युनियन स्थापण्याच्या हक्कासाठी, वेतनाच्या मागणीसाठी आणि चांगल्या आयुष्याच्या हमीसाठी एकत्रित येऊन लढत होत्या. ८ मार्च १९०८ रोजी न्यूयॉर्क येथील वस्त्रोद्योगातील हजारो स्त्री कामगार रूट गर्स चौकात निदर्शनासाठी जमल्या होत्या. दहा तासांचा कामाचा दिवस, कामाच्या ठिकाणी सुरक्षितता, लिंग, वर्ण, मालमत्ता आणि शैक्षणिक पार्श्वभूमीनिरपेक्ष सर्व प्रौढांना मतदानाचा हक्क, अशी या स्त्रियांची मागणी होती. कारण या काळात मतदानाचा हक्क केवळ पुरुषांनाच होता. जर्मनीमध्ये तर स्त्रियांना राजकीय पक्षात किंवा संघटनेत काम करण्याचीही परवानगी नव्हती. या अन्यायकारक नियम आणि धोरणांमुळेच जागतिक स्तरावर स्त्री नेतृत्व उदयाला येऊ लागले. सॅफ्राजिस्ट चळवळ हे याचे जिवंत उदाहरण आहे. १८९० मध्ये स्थापन झालेले 'द नॅशनल अमेरिकन वूमेन सफरेज असोसिएशन' देखील वांशिक व देशांतरितांविषयी पूर्वग्रह असणारी संघटना होती. काळ्या मतदारांपासून वाचविण्यासाठी स्त्रियांना मतदानाचा हक्क द्यावा, अशी या संघटनेची मागणी होती.

स्टूटगार्ड येथे १९०७ मध्ये पहिली आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषद भरली. त्यामध्ये क्लारा झेटकिन या लढाऊ झुंजार कम्युनिस्ट कार्यकर्त्या म्हणाल्या, 'सार्वत्रिक मतदानाचा हक्क मिळविण्यासाठी संघर्ष करणे हे समाजवादी स्त्रियांचे कर्तव्य आहे.'

१९०८ च्या न्यूयॉर्क येथील महिलांनी केलेल्या मागणीचे हेच सूत्र होते. जगभरातील स्त्रियांमध्ये जागृती निर्माण होत असल्याच्या प्रेरणेने क्लारा झेटकिनने ८ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिवस म्हणून स्वीकारावा, असा ठराव १९१० मध्ये कोपेनहेगनमध्ये भरलेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषदेत केला. ८ मार्च १९०८ रोजी स्त्री कामगारांनी केलेल्या प्रचंड निदर्शनाचे स्मरण म्हणून सार्वत्रिक मतदानाच्या मागणीसाठीचा कृतिदिन म्हणून यानंतर युरोप व अमेरिकेमध्ये हक्काच्या मोहिमा उघडल्या गेल्या आणि युरोपात १९१८ तर अमेरिकेत १९१९ मध्ये सार्वत्रिक मतदानासाठी चाललेल्या लढ्यांना यश आले.

**भारतीय स्वातंत्र्योत्तर काळातील नेतृत्व :**

स्वातंत्र्यानंतर राष्ट्रीय स्तरावर ज्या महिला नेतृत्वाचा उदय झाला त्यात माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे नाव अग्रक्रमावर घ्यावे लागते. संपूर्ण राजकीय वारसा लाभलेल्या इंदिरा गांधी यांची पंतप्रधान म्हणून कारकिर्द तर गाजवलीच शिवाय एक मुत्सद्दी राजकीय नेतृत्व म्हणून त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर जरब बसविली होती. राजकीय सामाजिक आणि आर्थिक धोरणाबाबत त्यांची जागतिक स्तरावर असलेली पकड लौकीकास पात्र होती. १९६७ ते १९८४ या काळात इंदिरा गांधी यांचा देशावर पूर्ण प्रभाव होता ज्या धाडसाने इंदिरा गांधी यांनी निर्णय घेतले तसे निर्णय नंतरच्या काळात कोणतेही पंतप्रधान घेवू शकले नाही.

इंदिरा गांधी यांच्यानंतर राजकीय क्षेत्रात विविध राजकीय पक्षांच्या माध्यमातून कार्यरत असलेल्या अनेक स्त्रियांनी नावलौकिक मिळविला यात विशेषतः सोनिया गांधी यांचे आघाडीवर आहे तसेच मध्यप्रदेशातील विजयाराजे शिंदे, वसुंधराराजे शिंदे, उत्तर प्रदेशातून सुषमा स्वराज मायावती, काश्मिरमधील मेहबुबा मुक्ती याशिवाय मागरिट अल्वा, मिराकुमार, अंबिका सोनी, महाराष्ट्रातून निलम गोऱ्हे, सुप्रियाताई सुळे, पूनम महाजन अशी तरी नावे आहेत. या प्रत्येक काळात महिलांमध्ये टप्प्याटप्प्याने नेतृत्व गुण विकसित झाल्याचे दिसते. मात्र राष्ट्रीय किंवा राज्यस्तरवर ज्या ज्या राज्यातून महिला नेतृत्व उदयाला आले त्यातील बहुतेक महिलांच्या कुटुंबात राजकीय वारसा असल्याचे दिसते.

असा कोणताही राजकीय वारसा नसताना जे महिला नेतृत्व स्वातंत्र्यापूर्व काळात घडेल त्यात सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई रानडे यांची नावे अग्रक्रमावर घ्यावी लागतील या महिलांनी राजकीय क्षेत्रापेक्षा सामाजिक क्षेत्रामध्ये अविरत कार्यरत राहून आपल्या कार्याचा ठसा उमटविला.

**स्थानिक स्तरावर महिला नेतृत्वाचा उदय :**

स्थानिक स्तरावर महिला नेतृत्वाच्या विकासाबाबत विचार करता १९२६ पासून खऱ्या अ अर्थानेक स्थानिक महिला नेतृत्वाला चालना मिळाल्याचे दिसून येते. याचे श्रेय अर्थातच लॉर्ड रिपन यांना जाते. लॉर्ड रिपन यांच्या कारकीर्दीत स्थानिक स्वराज्य संस्थांचे पुनरुज्जीवन झाले. या सर्व स्थानिक संस्था पाश्चात्य स्थानिक स्वराज्य

संस्थांच्या धर्तीवर कार्यरत झाल्या. या सर्व संस्थांमध्ये निवडणुकीचे तत्त्व मान्य करण्यात आले असले तरी १९२१ पर्यंत मुळात स्त्रियांना मतदानाचा अधिकारच नव्हता. त्यामुळे तोपर्यंत महिलांच्या नेतृत्वाला राजकीय क्षेत्रात तसा वाद नव्हताच १९२२ साली मुंबई महानगरपालिका अधिनियमाद्वारे महिलांना शिक्षण व संपत्ती निकषांच्या आधारे मताधिकार आणि निवडणूक लढविण्याचा अधिकार प्राप्त झाला. याच वर्षी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत महिलांनी मतदान केले.

वास्तविक महिलांना मिळालेला मतदानाचा किंवा निवडणूक लढविण्याचा अधिकार मर्यादित स्वरूपाचा असला तरी निवडणुकीचे तत्त्व मान्य करण्यात आले हे महत्त्वाचे होते. भारतात हा मान प्रथम मुंबईच्या महिलांना मिळाला. महिलांना सरसकट मतदान व निवडणूक लढविण्याचा अधिकार मिळावा म्हणून मुंबई महापालिकेत १९०६ नंतरच्या काळात सातत्याने ठराव मांडण्यात आल्याचे लक्षात येते. जाफर रहेमनुल्ला, रामकृष्ण नवलकर ही मंडळी असे ठराव मांडण्यात आघाडीवर होती. अखेर १९२२ साली त्यांना यश आले.

१९२३ साली झालेल्या निवडणुकीत ज्या चार स्त्रिया निवडून आल्या त्यात सरोजिनी नायडू, बच्चूबाई लोटवाला, हॅरी हॅडगिक्सन आणि अवन्तिकाबाई गोखले यांचा समावेश होता.

मुंबई महापालिकेत महिलांना संधी देण्याच्या भूमिकेचा किती फायदा झाला हे नंतरच्या काळात समोर आले. या माध्यमातून जे महिला नेतृत्व निर्माण झाले त्यांनी अखिल भारतीय स्तरावर कीर्ती मिळविल्याचे दिसून येते. यात सरोजिनी नायडू, व्हायोलेट अल्वा, जयश्री रायजी, लीलावती मुन्शी, खदिया तय्यबजी, मगीबेन कारा, सुलोचना मोदी यांची नावे अग्रक्रमावर आहेत. यातील सुलोचना मोदी या भारतातील पहिल्या महापौर ठरल्या.

अवन्तिकाबाई गोखले हे असेच एक नाव. त्यांनी १९२३ च्या निवडणुकीत प्रचंड बहुमताने विजय मिळवला. मात्र काही कारणाने त्यांची निवडणूक अवैध ठरली गेली. नंतर त्यांना स्वीकृत सदस्य म्हणून घेण्यात आले. १९३१ पर्यंत त्यांनी आपली कारकीर्द गाजवली. प्रारंभी एक वर्ष केवळ कामकाजाचे निरीक्षण करून नंतरच्या काळात त्यांनी ठराव मांडून महापालिकेच्या सभा गाजवायला सुरुवात केली. आपल्या कारकीर्दीत त्यांनी सार्वजनिक आरोग्य समितीवर कार्य केले. स्थायी समितीवरही त्यांची निवड झाली होती. निरनिराळ्या संस्थांवर महापालिकेच्या प्रतिनिधी म्हणून त्यांनी काम केले. यातून अशाप्रकारे एक सामाजिक नेतृत्व म्हणून आवन्तिकाबाईंची ओळख निर्माण झाली. महापालिकेवर काम करण्याची संधी मिळाल्यामुळे महाराष्ट्रातून हे महिला नेतृत्व उदयाला आले.

**महिलांच्या समस्या :**

''गावपातळीवरचे स्थानिक राजकारण हे अधिक 'समुदायी' स्वरूपाचे असते. स्थानिक प्रश्न सर्वांनाच माहित असतात. तेव्हा परस्पर सहकार्याने, संवाद साधून सहमती निर्माण करून सोडवता येतात. याकामी स्त्रियांचे 'पारंपरिक'गुण उपयोगाचे ठरतात. म्हणून त्यांना ते क्षेत्र योग्य आहे. या उलट राज्य देशपातळीवरील राजकारणातील समस्या गुंतागुंतीच्या, व्यवहार सौदेबाजीच्या, शक्तींच्या टकरावांच्या किंवा मेळ घालण्याच्या, तिथे 'स्त्री' कशी टिकणार? कशी यशस्वी होणार? असे मानून तिला त्या पातळीवरील भूमिका नाकारणे हे पारंपरिक पुरूषी मानसिकतेचे दर्शन आहे. त्याविरुद्ध सतत आवाज उठविल्याशिवाय राज्य आणि देशपातळीवरील निवडणुकीच्या राजकारणातील स्त्रियांचा प्रभाव वाढणार नाही.''

नव्वदीच्या शतकापासून 'लोकशाही' आणि 'लोकशाहीकरण' आणि 'स्त्री सक्षमीकरण' हे जागतिक पातळीवरील राजकीय चर्चाविश्वातील कळीचे शब्द बनले आहेत. देशांतर्गत राजकारण असो की जागतिक राजकारण असो राजकारणाचे एकूण आकलन आणि चिकित्सा ही आता लोकशाहीकरणाच्या संदर्भातच प्रायः केली जाते. स्पेन, पोर्तुगाल इत्यादी दक्षिण युरोपीय देशांपासून लोकशाहीकरणाच्या तिसऱ्या लाटेस आरंभ झाला. दक्षिण युरोपीय देशांत १९४७ साली सुरू झालेली ही लाट लॅटिन अमेरिकन देश, पूर्व युरोप, सोविएत युनियन, दक्षिण आशियायी देश आणि आफ्रिकी देशांपर्यंत येऊन धडकली आणि तिने त्या त्या भागातील अनेक अधिकारशाहीवादी अशा बिगर लोकशाही राजवटी संपुष्टात आणल्या. लोकशाहीकरणासाठीचे हे सर्व उठाव लोकांच्या उत्स्फूर्त सहभागातून आणि आंदोलनातून तसेच नागरी समाजाच्या सक्रियतेतून निर्माण झाले होते. देशोदेशीच्या या लोकशाहीकरणाच्या लाटेत स्त्रियांचाही सहभाग लक्षणीय होता. बिगर शासकीय संघटना, स्वयंसाहाय्यी गट, कृतिगट, सामाजिक चळवळी, सोशल मीडिया, निवडणुका आदी माध्यमातून लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेत स्त्रिया सक्रिय झाल्या होत्या. स्त्रियांचा हा सहभाग लोकशाहीकरणाला बळकटी आणणारा होता. देशोदेशीच्या या लोकशाहीकरणाच्या लाटेत स्त्रियांनी उचललेला वाटा लक्षात घेता लोकशाही

राजकारणाला एक नवे वळण मिळण्याची शक्यता निर्माण झाली. स्त्रियांच्या राजकारणातील वाढत्या सहभागामुळे लोकशाही राजकारण हे गुणत्मकदृष्ट्या बदलेल इतकेच नव्हे तर लोकशाहीची कल्पनाही अधिकाधिक आशयघन होत जाईल, असा आशावादही व्यक्त केला गेला. स्त्रियांच्या वाढत्या सहभागामुळे राजकारणाचा नैतिक स्तर उंचावेल, ते उत्तरोत्तर अधिक सभ्य बनत जाईल. अशीही उमेद निर्माण झाली. विशेषतः मानवाधिकाराच्या चळवळी, पर्यावरणवादाच्या चळवळी, शेतकरी चळवळी, चिरस्थायी विकासाच्या चळवळी, शांततावादी चळवळी, स्त्रियांच्या चळवळी या अनेक प्रकारच्या सामाजिक चळवळीमधून स्त्रियांनी जे मूलभूत प्रश्न उपस्थित केले आणि मुख्य प्रवाही सार्वजनिक धोरणांना अधिक आशयसंपन्न करण्याचा प्रयत्न केला तो पाहता स्त्रियांच्या राजकीय सक्रियतेमुळे सार्वजनिक प्रश्नांकडे पहाण्याचा एक वेगळा परिप्रेक्ष्य निर्माण झाला. भारतात महिला आरक्षणामुळे पंचायत राज्य संस्था आणि स्थानिक शासन संस्थांमधील स्त्रियांचे प्रतिनिधित्व वाढले. अनेक महिला सदस्यांनी स्थानिक प्रश्नांचे रुढ अग्रक्रम बदलून मुलभूत गरजांना व सुविधांना प्राधान्य देत उपलब्ध संसाधनांचा योग्य तो उपयोग करण्यात एक वेगळी दृष्टी दाखवली. त्यामुळे स्त्रिया लोकशाही राजकारणाचा अवकाश अतिशय कल्पकतेने आणि समर्थपणे व्यापू शकतात, इतकेच नव्हे तर राजकारणात गुणात्मक बदल घडवू शकतात याचे एक प्रकारे आश्वासनच मिळाले. संस्थात्मक, रचनात्मक आणि संघर्षात्मक राजकारणात स्त्रियांनी आपल्या क्षमता व कर्तबगारी अनेकदा सिद्ध केलेली आहे. असे असूनही जनआंदोलने किंवा सामाजिक चळवळीच्या माध्यमातून स्त्रिया ज्या प्रमाणात राजकारणावर प्रभाव पाडू शकतात तितक्या प्रमाणात राज्यपातळी आणि देशपातळीवरील निर्वाचनात्मक राजकारणावर त्या फारसा प्रभाव टाकू शकत नाहीत असाच अनुभव आहे. परिणामतः निर्वाचनात्मक राजकारण हे महिला सबलीकरणाची भाषा आपण कितीही मोठ्या आणि उत्सवी स्वरूपात बोलत असलो तरी, ते रूढ पद्धतीने व ठरावीक चौकटीत घडताना दिसते. संस्थात्मक राजकारण, निर्वाचनात्मक राजकारण आणि जनआंदोलनांचे राजकारण हे लोकशाही राजकारणाचे तीन प्रमुख आयाम आहेत. लोकशाही अधिक आशयघन आणि समृद्ध करावयाची असेल तर संस्थात्मक आणि आंदोनलात्मक राजकारणाबरोबरच निर्वाचनात्मक राजकारण आणि जनआंदोलनांचे राजकारण हे लोकशाही राजकारणाचे तीन प्रमुख आयात आहेत. लोकशाही अधिक आशयघन आणि समृद्ध करावयाची असेल तर संस्थात्मक आणि आंदोलनात्मक राजकारणाबरोबरच निर्वाचनात्मक राजकारण हे देखील उत्तरोत्तर भ्रष्टाचारमुक्त, बाहुबल मुक्त आणि वित्तबल मुक्त होणे गरजेचे आहे. निवडणुक सुधारणांच्या माध्यमातून आपल्याला या दिशेने जितके पुढे जाता येईल तितके पुढे जाण्याचा आपला प्रयत्न असेलच, पण विद्यमान निर्वाचनात्मक राजकारणाचे स्वरूप लक्षात घेता स्त्रियांच्या मतदानाचा टक्का वाढूनही राज्यपातळी व देशापातळीवरील त्यांच्या प्रतिनिधित्वाचे प्रमाण फारसे समाधानकारक नाही असेच दिसून येते. २००९ च्या लोकसभेत स्त्री खासदारांची संख्या अवघी ५७ होती. त्यातही गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या स्त्री खासदारांची संख्या १८ होती. या १८ खासदारांमध्ये ९ काँग्रेस पक्षाच्या तर ८ भाजपाच्या आणि अन्य एक असे चित्र दिसून येते. राज्यपातळीवरील आणि केंद्रीय पातळीवरील मंत्रिमंडळातही महिला मंत्र्यांचे प्रमाण नेहमीच अत्यल्प राहिले आहे. एका टप्प्यावर तर केंद्रीय पातळीवरील ७० जणांच्या जंबो मंत्रिमंडळात अवघी एक महिला कॅबिनेट दर्जाची मंत्री आणि केवळ ८ महिला राज्यमंत्री होत्या. २००९ च्या महाराष्ट्राच्या विधानसभेत २८८ सभासदांपैकी अवघ्या ११ स्त्रिया आमदार म्हणून निवडून आल्या. अगदी २०१४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेस, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना या महाराष्ट्रातील प्रमुख राजकीय पक्षांनी मिळून अवघ्या सात महिलांना संधी दिली. या सर्वांचा अर्थ काय होतो? महिला सबलीकरण, स्त्रियांच्या प्रतिष्ठेची ऊठसूट भाषा करणारे राजकीय पक्ष राज्य आणि देशपातळीवरील निवडणुकांमध्ये स्त्रियांना प्रतिनिधित्व देताना उघड उघड हात आखडता घेतात. एका बाजूला दलित, आदिवासी, बहुजन, मुस्लीम, ग्रामीण आणि शहरी स्त्री मतदारांचे प्रमाणे सातत्याने वाढत असताना राज्य आणि केंद्र पातळीवर स्त्रियांना त्या प्रमपाणात प्रतिनिधित्व का मिळत नाही? ३३ टक्के महिला आरक्षणाची भाषा बोलतानाच आपण त्यांच्या अपुऱ्या प्रतिनिधित्वाची जाहीर कबुली देत आहोत, याचे भान तरी आपल्याला राहते का? कौटुंबिक जबाबदाऱ्या, पुरेसे आर्थिक बळ नसणे, राजकारणाचे वाढते गुन्हेगारीकरण, चारित्र्य हननाची भीती आणि दहशत या कारणास्तव मोठ्या पातळ्यांवरील निर्वाचनात्मक राजकारणात स्त्रियांचा अवकाश आक्रसत जातो, असा निष्कर्ष उपलब्ध अभ्यासांतून वारंवार प्रकट झाला आहे. निर्वाचनात्मक राजकारणात यशस्वी होऊन ज्या स्त्रियांना राज्य अथवा केंद्र पातळीवर प्रतिनिधित्वाची संधी मिळाली अशा स्त्री प्रतिनिधींनी देखील आपली विषय कक्षा प्रायः स्त्री प्रश्नांपुरतीच मर्यादित ठेवल्याचे दिसते. उदा.

स्त्रियांवरील अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार, हुंडा–बळी या प्रश्नांच्या संदर्भात त्या जितक्या परिणामकारक भूमिका घेताना दिसतात तितक्या प्रमाणात त्या संरक्षण, विदेश नीती, औद्योगिक धोरणे, व्यापारविषयक धोरणे, शेती, तंत्रज्ञान व विज्ञान या महत्त्वाच्या प्रश्नांवर फारशा बोलताना दिसत नाहीत आणि बोलल्याच तर त्यांचा भर हा अशा धोरणांतील लिंगभावात्मक पक्षपातीपणा उघडा पाडण्यापुरताच मर्यादित राहतो. असा पक्षपातीपणा तर जरूर उघडा केला पाहिजे आणि त्या स्त्रिया अधिक चांगल्या पद्धतीने उघडा पाडू शकतात यातही वाद नाही. पण हे करताना आपली प्रतिनिधित्वाची भूमिका केवळ एखाद्या प्रश्नाची लिंगभावात्मक बाजू पुढे आणण्यापुरतीच मर्यादित केली जात नाही ना याचीही खबरदारी घेतली पाहिजे, नाहीतर अनेक महत्त्वाच्या क्षेत्रातून स्त्रियांना हद्दपार करण्याचा एक सुलभ मार्ग या निमित्ताने प्रस्थापित हितसंबंधितांना अनायासच मिळतो. किंबहुना आजवरचा अनुभव असा आहे की महिला वर्ग आणि स्त्री प्रश्नांबाबतची संवेदनशीलता दाखवत अनेक राजकीय पक्ष आणि राज्य व केंद्र पातळीवरील प्रतिष्ठित राजकीय नेते मोठ्या खुबीने स्त्रियांचे प्रतिनिधित्व स्त्री प्रश्नांपुरतेच मर्यादित ठेवताना आढळतात. उदाहरणार्थ पक्ष संघटनेच्या पातळीवरी महिला आघाड्या निर्माण करून तेवढी जबाबदारी स्त्रियांवर टाकणे किंवा सरकारच्या पातळीवर महिला आयोग, समाज कल्याण, शिक्षण यांसारख्या क्षेत्रात त्यांची वर्णी लागून त्यांना तेथेच एका परीने अडकवून ठेवणे या बाबी आपण अनुभवलेल्याच आहेत.

वास्तविक पाहता प्रतिनिधित्वाची संकल्पना खूपच व्यापक आहे. लोकप्रतिधीला प्रतिनिधित्व करताना एकाच वेळी चार आघाड्यांवर काम करावे लागते. त्याला एका बाजूला आपल्या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करावे लागते, दुसऱ्या बाजूला आपापल्या पक्षाच्या विचारसरणीचे व पक्षीय धोरणे व कार्यक्रमाचे प्रतिनिधित्व करावे लागते, तिसऱ्या बाजूला ज्या समाज घटकातून तो किंवा ती आलेली आहे. (उदा. वर्ग–जात–भाषा–ग्रामीण–दलित–बहुजन–आदिवासी–शहरी–महानगरीय इत्यादी) त्याही सामाजिक स्तराचे प्रतिनिधित्व करावे लागते आणि चौथ्या बाजूला महत्त्वाच्या सार्वजनिक प्रश्नांच्या संदर्भातील धोरणविषयक भूमिका आणि दृष्टीचे प्रतिनिधित्व करावे लागते. या निकषांवर किती स्त्री प्रतिनिधींना या चारही आघाड्यांचे भान ठेवून आपल्या प्रतिनिधित्वाच्या कारकिर्दीचे नियोजन व त्यानुसार वाटचाल केलेली आहे. याचाही विचार करणे हितावह ठरेल. जोवर असा विचार स्त्रिया करणार नाहीत तोवर त्यांचे प्रतिनिधित्व स्त्री प्रश्नांपुरतेच मर्यादित ठेवण्याची पुरुषसत्तेची खेळी नेहमीच यशस्वी होत राहणार.

आज सार्वजनिक जीवनात स्त्री–अत्याचार, लिंगभावात्मक न्याय, स्त्रियांची सुरक्षितता, स्त्री सक्षमीकरण, स्त्रियांचा सार्वजनिक जीवनातील वाढता सहभाग, महिला विकास, स्त्रियांचे हक्क, स्त्री–पुरूष समता या विषयावर (पोलिटिकली करेक्ट) राजकीयदृष्ट्या नेमके आणि अचूक काय बोलायचे याचे कसब सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांनी बऱ्यापैकी आत्मसात केले आहे. पण राजकीदृष्ट्या अचूक बोलण्यामागे कोण खऱ्या स्त्री स्वातंत्र्याची व सक्षमीकरणाची भाषा बोलतो आणि कोण हे सारे शब्द वापरत केवळ पुरुषी चौकटीतून स्त्री संरक्षणाची व सुरक्षिततेची भाषा–बोलतो यातला फरक लक्षात आला पाहिजे. स्त्री–प्रतिष्ठा, स्त्रीची इज्जत, 'डिग्निटी ऑफ वुमन' या शब्दांवर जोर देऊन बोलणारी नेते मंडळी बऱ्याचदा 'स्त्री इज्जत' जपण्यसाठी जबाबदारी 'मर्दानी पुरुषाची' आहे हे आधोरेखित करत असतात आणि पुरुषाला स्त्रीचा संरक्षक म्हणून सादर करतात. अशी मंडळीच मग स्त्रीवर अत्याचार करणाऱ्याला भर रस्त्यावर फाशी देण्याची भाषा बोलू लागतात आणि दुसऱ्या बाजूला मुलायमसिंग किंवा अबू आझमीसारखी मंडळी 'बलात्कार करणारे गुन्हेगार हे शेवटी मुलेच होती किंवा पुरुषाच्या संमतीने वा संमतीशिवाय पुरुषांबरोबर बाहेर जाणाऱ्या स्त्रीलाही शिक्षा झाली पाहिजे' अशी बेताल आणि निर्लज्ज विधाने करीत गंभीर प्रश्नाला क्षुल्लक मुद्यांचे स्वरूप देतात. वास्तविक स्त्री इज्जतीची पुरुषी चौकटीतून भाषा करणारे नेते आणि मुलायम सिंग आझमीसारखी मंडळी ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. हे लक्षात घ्यायला हवे.

निवडणुकीच्या राजकारणाचे 'सार्वजनिक क्षेत्र' हे बाहुबल, गुन्हेगारी आणि अवैध मार्गाने व्यापलेले आहे. ते स्त्रियांसाठी सुरक्षित नाही. म्हणून त्यातून स्त्रियांना दूर ठेवावे लागते अशी मखलाशी करणारे किंवा स्थानिक पातळीवर स्त्रियांना अधिकाधिक प्रतिनिधित्व देत आम्ही 'ग्रास रूट लेव्हल' वर स्त्री सबलीकरणास प्राधान्य देत आहेत. अशी सफाई देणारी मंडळी ही देखील उपरोक्त 'स्त्री इज्जतीची' किंवा 'स्त्री शिक्षेची' भाषा करणाऱ्या मंडळींचीच सौम्य रूपे आहेत. हेही चाणाक्षपणे ओळखायला हवे. स्थानिक पातळीवर स्त्री प्रतिनिधित्वाचा उदो उदो करीत, राज्य आणि देशपातळीवर मात्र कधी 'निवडुकीतील हुकमी विजयाची' कसोटी लावत तर कधी त्या पातळीवरील 'असुरक्षितेची' भिती

सूचित करून स्त्रियांना प्रतिनिधित्व नाकारणे हे स्त्री हिताचेही नाही आणि लोकशाही राजकारणाच्याही हिताचे नाही. हे तर स्त्री प्रतिनिधित्वाचे 'स्थानिकीकरण' झाले.

गाव पातळीवरचे स्थानिक राजकारण हे अधिक 'समुदायी' स्वरुपाचे (कम्युनिटॅरियन) असते. स्थानिक प्रश्न सर्वांनाच माहित असतात. ते छोटे असतात आणि त्यावर उपायही माहित असतो. तेव्हा परस्पर सहकार्याने, संवाद साधून सहमती निर्माण करून सोडवता येतात. या कामी स्तियांचे 'पारंपरिक' गुण केअरिंग, शेअरिंग, नर्चरिंग अधिध उपयोगाचे ठरतात. म्हणून त्यांना ते क्षेत्र योग्य आहे. या उलट राज्य, देशपातळीवरील राजकारणातील समस्या गुंतागुंतीचा, व्यवहार सौदेबाजीचा, शक्तींचा टकरावांचा किंवा मेळ घालण्याचा, तिथे 'स्त्री' कशी टिकणार कशी यशस्वी होणार? असे मानून तिला त्या पातळीवरील भूमिका नाकारणे हे पारंपरिक पुरूषी मानसिकतेचे दर्शन आहे. त्याविरुद्ध सतत आवाज उठविल्याशिवाय राज्य आणि देशपातळीवरील निवडणुकीच्या राजकारणातील स्त्रियांचा प्रभाव वाढणार नाही. संख्यात्मक आणि आंदोलनात्मक राजकारणात स्त्रियांनी आपली कर्तबगारी दाखवलीच आहे. लोकशाहीच्या समृद्धीकरणासाठी निर्वाचनात्मक राजकारणातही स्त्रियांनी मुसंडी मारायला हवी अन्यथा त्यांचा विचार निव्वळ कशी यशस्वी होणार? असे मानून तिला त्या पातळीवरील भूमिका नाकारणे हे पारंपरिक पुरूषी मानसिकतेचे दर्शन आहे. त्याविरुद्ध सतत आवाज उठविल्याशिवाय राज्य आणि देशपातळीवरील निवडणुकीच्या राजकारणातील स्त्रियांचा प्रभाव वाढणार नाही.'मतपेढी' म्हणून होत राहील.

**समारोप :**

स्त्रिया पुढे याव्यात, त्यांच्यात नेतृत्वगुण विकसित व्हावेत व राष्ट्र उभारणीच्या कार्यात त्यांचा हातभार लागावा म्हणून शासनाने मुद्दाम या सुधारणा केल्या आहेत. प्रारंभी यातून स्त्रियांचा राजकारणातील किंवा निर्णयप्रक्रियेतील सहभाग एकदत वाढला नाही; परंतु हळूहळू याचा दृश्य परिणाम दिसू लागली आणि आज ग्रामीण स्तरातून राष्ट्रीय स्तरापर्यंत महिला नेतृत्व खऱ्या अर्थाने विकसित झालेले आपल्याला पहावयास मिळते. अर्थात आजही ग्रामीण किंवा निमशहरी स्तरावर महिला नेतृत्वाच्या कार्याला अनेक मर्यादा असल्याचे आढळून येत असले तरी विविध पदावर आरुढ झाल्यानंतर त्या कार्याचा अभ्यास करून सरकारी निर्णयप्रक्रियेत सहभागी होणाऱ्या अनेक महिला आहेत. पूर्णार्था नसले तरी महाराष्ट्रात महिला नेतृत्व विकसित होत असल्याचे चित्र आज आपल्याला पहावयास मिळते.

**संदर्भ :**

१. डॉ. पवार प्रकाश, 'भारतीय राजकारण आणि नेतृत्वाची वाटचाल' डायमंड प्रकाशन, पुणे.
२. लोकसत्ता दैनिक, २६ एप्रिल, २०१४.
३. डॉ. खेकाळे नारायण, १९९९, 'राजीय नेतृत्व' श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.
४. राजेंद्र व्होरा आणि पळशीकर, १९८७, राज्यशास्त्र शब्दकोश, दास्ताने प्रकाशन, पुणे. रामचंद्र आणि कंपनी.
५. अंजली मुळे, गीताली वि. म. २००१, 'स्त्री चळवळ आणि राजकारण' समतेसाठी सत्तासंघर्ष. लोकवाङ्मयगृह, मुंबई.
६. मराठी विश्वकोश, खंड – ८, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.